# कलियुगातील गोपी-कृष्ण
# वृषाली आणि प्रतीक्षा

## अनुक्रमणिका

**प्रकरण १**

'तिसरी गोपी' कु. वृषाली कुंभार (वय २३ वर्षे)


१. साधनेचा प्रवास १६

२. वृषालीच्यासंदर्भात तिच्या आईला जाणवलेली सूत्रे २६

३. प.पू. डॉक्टरांविषयीचा भाव २९

४. प.पू. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे 'रासलीला' ग्रंथ वाचल्यानंतर गोपींप्रमाणे प्रयत्न करण्याची तळमळ वाढणे ३१

५. कृष्णाशी एकरूप होण्याच्या ध्येयाची सतत जाणीव करून देऊन साधनेच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणाऱ्या अध्यात्मातील मैत्रिणी (कृष्णसख्या) तृप्ती गावडे आणि दीपाली मतकर ! ३३

६. श्रीकृष्ण समवेत असल्याचे जाणवणे आणि त्याबद्दलचा कृतज्ञताभाव ३६

७. गोपीभावात राहिल्यावर साधिकेला स्वतःच्या पूर्वीच्या आणि आताच्या मनस्थितीत जाणवलेला पालट ४०

८. प.पू. डॉक्टरांनी 'गोपी कोणाला म्हणणार', असे विचारल्यावर त्याविषयी श्रीकृष्णाने सुचवलेली गोपींची गुणवैशिष्ट्ये ! ४४

९. गोपी वृषालीची आध्यात्मिक पातळी ६० टक्के होणे ४४

१०. ती. अप्पाकाका (प.पू. डॉक्टरांचे ज्येष्ठ बंधू डॉ. वसंत बाळाजी आठवले) यांनी 'तिसऱ्या गोपी'कडून श्रीकृष्णाविषयी जाणून घेणे ५५

११. प.पू. डॉक्टरांच्या प्रश्नांना वृषालीने भक्तीयोगानुसार दिलेली उत्तरे ५७

१२. प.पू. डॉक्टर आणि गोपी यांचे हसणे ५९

१३. श्रीकृष्णाच्या भावविश्वात रममाण झालेल्या सनातनच्या गोपींची आध्यात्मिक स्तरावर उलगडलेली भावस्पर्शी वैशिष्ट्ये ! ६०

१४. गोपींचा श्रीकृष्णाशी विवाह होणार असणे (गोपी श्रीकृष्णाशी एकरूप होणार असणे) ६४

## प्रकरण २

### श्रीकृष्णाप्रती असलेला उत्कट भाव आणि त्याच्याशी सतत अनुसंधान असणारी कु. प्रतीक्षा आचार्य (वय १७ वर्षे)


१. लहानपणापासून कृष्णभक्ती आणि त्याच्या लीला यांत रमणे ६९

२. घरी असतांनाचे वैशिष्ट्यपूर्ण वागणे ७१

३. आश्रमात साधनेसाठी आल्यानंतर स्वतःमध्ये जाणवलेले पालट ७२

४. १७ वर्षांच्या प्रतीक्षाची 'प्रतीक्षा' संपली आणि श्रीकृष्णाशी एकरूप होण्यातील एक टप्पा गाठून ती जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त झाली (६० टक्के पातळीची झाली) ! ७३

५. गुणवैशिष्ट्ये (आध्यात्मिक आणि सूक्ष्मातील) ७७

६. ६० टक्के आध्यात्मिक पातळी असणारी प्रतीक्षा आचार्य हिच्याविषयी जाणवलेली सूत्रे ८७

७. श्रीकृष्णाशी पूर्णपणे एकरूप झालेला उच्च स्वर्गलोकातील कलाकार जीव म्हणजे कु. प्रतीक्षा आचार्य ! ८९

८. जाणवलेले शारीरिक पालट ९१

९. प्रतीक्षामुळे आलेल्या अनुभूती ९१

१०. प्रतीक्षा काढत असलेल्या श्रीकृष्णाच्या भावपूर्ण चित्रांविषयी साधकांना जाणवलेली सूत्रे ९४

११. प्रतीक्षाचा चित्रकलेतून श्रीकृष्णाप्रती असलेला भाव व्यक्त होत असला, तरीही ती नृत्याच्या माध्यमातूनही तोच भाव व्यक्त करू शकणे ९६

१२. प्रतीक्षाला आलेल्या अनुभूती ९७

# मनोगत

## द्वापरयुगातील गोपींची आठवण करून देणाऱ्या कलियुगातील सनातनच्या रामनाथी ( गोवा ) आश्रमातील गोपी !

भक्ती कशी असावी, यासंदर्भात 'नारदीय भक्तिसूत्रां'त (अध्याय २, सूत्र २१) लिहिले आहे, 'यथा व्रजगोपिकानाम् ।', म्हणजे 'व्रजातील गोपींनी केली तशी (भक्ती)'. अनेक ऋषीमुनींनी भक्तीचा अनुभव घेण्यासाठी श्रीकृष्णाच्या वेळी गोपींच्या रूपात जन्म घेतला. मोठमोठ्या ऋषीमुनींना भक्तीसाठी गोपींना गुरु करण्यास सांगण्यात आले होते. अशा गोपींच्या संदर्भात माझ्या मनात जिज्ञासा होती. सनातनच्या रामनाथी (गोवा) आश्रमातील कु. तृप्ती गावडे, कु. दीपाली मतकर, कु. वृषाली कुंभार, कु. प्रतीक्षा आचार्य इत्यादी साधिकांच्या बोलण्या–वाागण्यातून, दृष्टीतून, पूजा करण्यातून 'अखंड कृष्णभावात असणे म्हणजे काय', ते शिकायला मिळाले.

एकदा दीपालीने मला विचारले, "कृष्णाची राधा एकच होती. आता किती राधा असतील ?" मी म्हणालो, "द्वापरयुगात राधेने जे राधातत्त्वाचे बीज रोवले, त्यापासून आता कलियुगात लहान लहान अनेक फळे निर्माण झाली आहेत. तीफळे म्हणजेच राधातत्त्व असलेल्या साधिका, म्हणजेच कलियुगातील रामनाथी आश्रमातील गोपी."

एकदा दीपाली म्हणाली, "एका पुस्तकात गोपींची चांगली गोष्ट आहे." गोपींना प्रत्यक्ष पहात असल्यामुळे, त्यांचा अनुभव प्रतिदिन घेत असल्यामुळे मला आता गोपींच्या गोष्टी वाचाव्याशा वाटत नाहीत; मात्र कधीकधी वाटते की, मीपण त्यांच्यासारखीच एक गोपी असायला हवा होतो, म्हणजे ऋषींनी अनुभवला, तसा गोपीभाव मीही अनुभवला असता. अशा या रामनाथी आश्रमातील गोपींच्या संदर्भातील माहिती या ग्रंथमालिकेत संकलित केली आहे. प्रत्येकीची इतकी माहिती जमा झाली की, प्रत्येकीचा स्वतंत्र ग्रंथ करावा लागला. त्यामध्ये या गोपी गोपीभाव कशा शिकल्या, त्यांनी तो एकमेकींना कसा शिकवला, त्यांना कृष्णभेटीची तळमळ कशी लागली आहे, त्यांचे एकमेकींमध्ये संभाषण कसे होते इत्यादी माहिती आहे. ही माहिती इतरांनाही स्वतःमध्ये गोपीभाव निर्माण करण्यासाठी उपयोगी आहे.

महर्षि व्यासांना चार वेद, पुराणे, ब्रह्मसूत्रे आणि महाभारत इत्यादी लिहूनही शांती मिळत नव्हती. ते चिंताग्रस्त अवस्थेत बसले असतांना त्यांना देवर्षि नारद भेटले आणि त्यांनी शांतीसाठी भगवंताविषयी गुणवर्णनपर ग्रंथ लिहिण्यास सांगितले. त्याप्रमाणे व्यासांनी 'भागवतपुराण' लिहिले आणि त्यांना भाव, आनंद अन् शांती यांची अनुभूती आली. आतापर्यंत संकलित केलेल्या ग्रंथांमुळे मी जो भाव, आनंद अन् शांती अनुभवली नाही, ते सर्व या ग्रंथामुळे थोड्याफारप्रमाणात अनुभवत आहे.

एकजण कालिदासाचा पत्ता विचारत होता. त्याला एका व्यक्तीने सांगितले, "ज्या

घरातदास-दासीही अस्खलित संस्कृतमध्ये बोलतात, ते कालिदासाचे घर समजा.'' त्याचप्रमाणे 'जेथे कृष्णाप्रती भाव असलेल्या साधिका आहेत, तो म्हणजे रामनाथी आश्रम', असे आता मला वाटू लागले आहे. रामनाथी आश्रमाची ओळख 'जेथे सहदाो ग्रंथांची निर्मिती झाली, ते स्थान' याऐवजी 'जेथील साधिका गोपीभावात रहातात, तो म्हणजे रामनाथी आश्रम' ही ओळख साधकांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाची ठरेल.

## १. प.पू. भक्तराज महाराज यांनी ५० वर्षांपूर्वीच कृष्णभक्तीचे, गोपीभावाचे जे बीज रोवले होते, ते आता फळाला येत आहे !

माझे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी वर्ष १९५६-५७ मध्ये कृष्णभक्तीची भजने लिहिली. त्यांतील निवडक ओळी पुढे दिल्या आहेत. त्यावरून त्यांनी ५० वर्षांपूर्वीच कृष्णभक्तीचे, गोपीभावाचे जे बीज रोवले होते, ते आता फळाला येत आहे, हे लक्षात आले.

### १ अ. गोकुळात नांदे हरि ।

गोकुळात नांदे हरि । यमुनेच्या तिरी ।
गोपीसंग लीला करी । यमुनेच्या तिरी ।। धृ. ।।
नेत्र अधीर पहाण्या ज्याला । राधेचा कैवारी ।
राधेचा कैवारी ।।
हरि वाजवितो मुरली । तहान-भूक ज्याने हरली ।
हरि रासलीला करी । भुलल्या गोकुळीच्या नारी ।
- संत भक्तराज महाराज (श्रीसद्‌गुरूंसमोर, तराणा. २८ ऑगस्ट १९५६)

### १ आ. वेणू कुणी वाजविला ।

वेणू कुणी वाजविला ।
सखे ग वेणू कुणी वाजविला ।। धृ. ।।
ऐकूनी रव तो वेणूनादाचा ।
जीव माझा घाबरला । सखे ग ।। १ ।।
ओष्ठी अमृत मधुर पानाने ।
जीव कोणी गुंगविला । सखे ग ।। २ ।।
नादलहरी त्या भुलवी जिवाला ।
तोल मनाचा गेला । सखे ग ।। ३ ।।
असा नाद हा वाजविणारा ।
नयनी कुणी पाहियला । सखे ग ।। ४ ।।
- संत भक्तराज महाराज (३ डिसेंबर १९५७)

### १ इ. माझे मन मोहिले रे ।

माझे मन मोहिले रे ।
कान्हा यदुकुलराणा ।। धृ. ।।
गोपीसंगे तू लीला करिसी ।
वृंदावनी तू दही-दूध खासी ।
ऐकियले बहू तव लीलेसी ।
का दावी ना आम्हासी ।
ते सौख्य ह्याची नयना ।।

– संत भक्तराज महाराज (२० एप्रिल १९५७)

१ ई. मधु मुरलीचा नाद तो ।

मधु मुरलीचा नाद तो ।
जरा थांबवी रे तू आता ।। धृ. ।।
तालसुराचे हे ज्ञान नसे ।
मज ज्ञान नसे ।
वाजविणारा न नयनी दिसे ।
माझ्या नयनी न दिसे ।
झाले कन्हैया बावरी ।
किती गुंगविसी रे आता ।। १ ।।

– संत भक्तराज महाराज

### २. शिंपल्यातील मोत्याप्रमाणे प्रकट झालेल्या सनातनच्या गोपी !

'प.पू. भक्तराज महाराज यांचे एक भजन आहे, 'सोनियाच्या शिंपल्यात । घावला हा चिंतामणी ।' शिंपल्यातील मोती कोणी मानव निर्माण करत नाही. तो मानवाला आयताच मिळतो. त्याचप्रमाणे सनातनच्या गोपींना कोणी गोपीभाव शिकवला नाही. त्यांच्यात तो सनातनमध्ये येण्याआधीपासूनच होता. सनातनचे भाग्य हे की, शिंपला हळूहळू उघडून त्यातून मोती दिसावा, तसे गोपींतीलगोपीतत्त्व हळूहळू विकसित होऊन ते सर्वांना अनुभवता आले.' (ज्येष्ठ कृ. १२, कलियुग वर्ष ५११४ (१६.६.२०१२))

### ३. कलियुगातील गोपी व्यष्टी साधनेसह समष्टी साधनाही करणार असणे !

'द्वापरयुगातील गोपींनी केवळ व्यष्टी साधना केली. श्रीकृष्ण मात्र स्वतः विश्वाचा, म्हणजेच समष्टीचा कार्यभार सांभाळतो; म्हणूनच त्याच्याशी लवकर एकरूप होण्यासाठी समष्टी साधना साहाय्यभूत ठरते. कलियुगातील गोपी काळानुसार आवश्यक म्हणून व्यष्टी साधनेसह समष्टी साधनाही करणार आहेत. त्यासाठी त्या सर्वत्र जाऊन गोपीभाव कसा निर्माण करायचा, हे

या गुरुपौर्णिमेनंतर शिकवणार आहेत. त्यामुळे साधकांना व्यष्टी साधनेत लाभ होईल, तसेच कृष्णतत्त्व व्यापक स्तरावर पसरल्याने त्याचा समष्टीलाही लाभ होईल.

श्रीकृष्णाने माझी गोपींच्या संदर्भातील जिज्ञासा पूर्ण केली; म्हणून मी त्याच्या चरणी कृतज्ञ आहे. **- डॉ. आठवले ( वैशाख कृ. ४, कलियुग वर्ष ५११४ ( ९.५.२०१२.) )**